दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
RNI No. MAHMAR 2017/74482
संपादक: संजय पवार
महाराष्ट्र वर्ष ८ वे | सोमवार २३ जून २०२५ | अंक २९४ • पाने ४ | किंमत २ रु

## रोजचे मृत्यू रोखण्यासाठी काय उपाययोजना करणार?

मुंबई : येथील मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ ९ जून रोजी लोकलमधून पडून झालेल्या मृत्यूबाबत मुंबई हायकोर्टाने शुक्रवारी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. गेल्या १५ वर्षांत मृत्यूची संख्या ४६ टक्क्यांनी कमी झाल्याचा दावा रेल्वे प्रशासन करीत असले तरी रोज १० प्रवाशांचा मृत्यू होणे चिंताजनक आहे.

## बीडमध्ये ८० हजारांच्या वसुलीसाठी तरुणाचे अपहरण

बीड - वाढत्या गुन्हेगारीमुळे चर्चेत असलेल्या बीडमधून आणखी एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. व्याजावर दिलेल्या ८० हजार रुपयांची वसुली करण्यासाठी येथे एका तरुणाचे अपहरण करण्यात आले. ही घटना धारूर तालुक्यातील आहे.अपहरण झालेल्या तरुणाचे नाव कृष्णा मैंद आहे. काही महिन्यांपूर्वी कृष्णाने धनराज चाटे, पृथ्वीराज आणि परमेश्वर या तिघांकडून १० हजार रुपये उसने घेतले होते.

## शेतक-यांनी कर्ज भरलेच पाहिजे : कर्जमाफीचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा कृषिमंत्री माणिकराव कोकाटे

■ लोकांकीत न्युज नेटवर्क

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतक-यांची योग्यवेळी कर्जमाफी करू, असे वक्तव्य केले होते. यानंतर नुकतेच कृषिमंत्री माणिकराव कोकाटे शेतक-यांनी कर्ज भरायलाच हवे, असे म्हणाले. कर्जमाफीचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे. त्यांचा विचार लवकरच कार्यान्वित होईल, असे विधान करत कर्जमाफीच्या मुद्यावर भाष्य केले आहे.




दरम्यान, विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीने सत्तेवर आल्यानंतर राज्यातील शेतक-यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन आपल्या जाहीरनाम्यात दिले होते. महायुतीने पुन्हा एकदा राज्यात सत्ता स्थापन केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारला आता सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी उलटला आहे. मात्र, अद्याप कर्जमाफीबाबत कोणतीही ठोस घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे शेतकरीवर्गातून नाराजीचा सूर उमटत आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीबाबत मी अतिशय संवेदनशील आहे. कर्जमाफी कधी द्यायची, याचे काही नियम आहेत आणि त्यासाठी ठरलेली प्रक्रिया असते. सरकारने दिलेला एकही शब्द आम्ही मागे घेणार नाही. योग्य वेळी, योग्य निर्णय घेतला जाईल, असे वक्तव्य केले होते.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी कोपरगाव येथे माध्यमांशी बोलताना विविध मुद्यांवर भाष्य केले. यावेळी ते म्हणाले, कर्जमाफीचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे. त्यांचा विचार लवकरच कार्यान्वित होईल. शेतक-यांनी कर्ज भरलेच पाहिजे. मात्र कर्जमाफी संदर्भातील निर्णय मुख्यमंत्री घेतील, असे त्यांनी बोलले आहे. तर बोगस बियाणे आणि औषधांसंदर्भात ज्या कृषिसेवा केंद्राच्या बाबतीत तक्रार दाखल होईल, त्यावर तात्काळ कारवाई केली जाईल. माझ्याकडे तक्रार आली तर मी लगेच कारवाई करणार आहे, असा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला.सरकारी गुंतवणुकीमुळे शेतक-यांचा फायदा होईल

सरकारने शेतीत भांडवली गुंतवणूक करावी ही माझी धारणा आहे. सरकार पाच वर्षांत २५ हजार कोटी रुपये भांडवली गुंतवणुकीसाठी खर्च करणार आहे. परदेशी धर्तीवर भारतातल्या शेतक-यांना देखील न्याय मिळाला पाहिजे. सरकारी गुंतवणुकीमुळे शेतक-यांचा फायदा होईल, असेही माणिकराव कोकाटे यांनी म्हटले आहे.

नाशिकच्या पालकमंत्रिपदाबाबत प्रतिक्रिया दरम्यान, नाशिकच्या पालकमंत्रिपदावरून महायुतीमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून रस्सीखेच सुरू आहे. या पदासाठी भाजपचे गिरीश महाजन आणि शिंदे गटाचे दादा भुसे आपापल्या पक्षातून आघाडीवर आहेत. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार माणिकराव कोकाटे यांचेही नाव चर्चेत आहे. याबाबत विचारले असता नाशिकच्या बाबतीत फार विवाद नाहीत. पालकमंत्रिपदावर कुणाचाही दावा नाही. मुख्यमंत्री निर्णय घेतील आणि तो सर्वांना मान्य असेल, असे माणिकराव कोकाटे यांनी म्हटले आहे.

## तीन वर्षांनंतर औषध खरेदी प्रस्तावाला मंजुरी; पालिका रुग्णालयातील औषधांची आणीबाणी संपुष्टात येणार

■ लोकांकीत न्युज नेटवर्क

मुंबई : तीन वर्षांनंतर मुंबई महापालिकेच्या रुग्णालयांमधील मोफत औषधांचा पुरवठा करणाऱ्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे.




२०२२ पासून प्रस्ताव रखडल्यामुळे महापालिका रुग्णालयांमध्ये औषधांसाठी आणीबाणी होती. दरम्यान, औषध खरेदीच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यामुळे येत्या महिन्याभरात ही औषधे आणि वैद्यकीय साहित्य रुग्णालयात उपलब्ध होणार आहे. त्यामुळे महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये आता औषधे गोळ्यांसह इतर आवश्यक साहित्यांची चणचण भासणार नसल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.

मुंबई महापालिकेच्या प्रमुख रुग्णालयांसह विशेष आणि उपनगरीय रुग्णालये आणि दवाखाने, आरोग्य केंद्र आणि प्रसूतिगृहांमधील रुग्णांना महापालिकेच्या अनुसूचीवर औषधे मोफत पुरवठा करण्यात येतो.

## लोकनेते दी. बा. पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त साजरा होणार समाजासाठी एक पाऊल पुढे कार्येक्रम

■ लोकांकीत न्युज नेटवर्क

नवी मुंबई :- २५ जून हा लोकनेते दी. बा. पाटील यांचा पुण्यतिथी दिन, १३ जानेवारी १९२६ रोजी एका सामान्य शेतकरी तथा शिक्षक असणाऱ्या बाळू गौरु पाटील यांच्या घरी दिनकर बाळू पाटील यांचा जन्म झाला.दिनकर बाळू पाटील अर्थात दी. बा. पाटील यांनी आपली संपूर्ण हयात लोक चळवळीत घातली.दि. बा. पाटील हे पनवेल पालिकेचे नगराध्यक्ष, महाराष्ट्रातील पनवेल-उरण विधानसभा मतदारसंघाचे ४ वेळा आमदार, महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते आणि रायगडचे दोन वेळा खासदार होते. सिडको (सिटी इंडस्ट्रियल डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन) ही सरकारी संस्था त्यावेळी नवी मुंबईची बांधणी करत होती. त्या काळात दि. बा. पाटलांनी नवी मुंबई सिडको आणि जेएनपीटी (न्हावा शेवा बंदर) प्रकल्पग्रस्त



जनतेचे खंबीर नेतृत्व केले. शेतकरी-कष्टकऱ्यांसाठी सारे आयुष्य झिजवले. पोलिसांचा लाठीमार सहन केला, तसेच कारावासही पत्करला. असा लोकनेता २५ जून २०१३ रोजी काळाने हिरावून घेतला. २५ जून हा दिन ह्याच महान लोकनेत्याचा पुण्यतिथी दिन. दी. बा पाटील यांनी सुरु केलेली लोक चळवळ त्यांच्या नंतरही सुरु राहावी याकरिता''नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्था''यांच्या वतीने दि. बा. पाटील साहेबांच्या पुण्यतिथीचे निमित्त साधून '' चला समाजासाठी एक पाऊल पुढे टाकूया '' हा कार्येक्रम आयोजित करण्यात आला आहे.या कार्येक्रमा अंतर्गत पनवेल पारिसरातील ज्येष्ठ नागरिकांना छत्र्या भेट देण्यात येणार आहेत तसेच नवी मुंबई विभागातील १० वी व १२वीच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव देखील केला जाणार आहे.जिथे ज्येष्ठ नागरिकांना छत्र्या भेट व १० वी व १२वीच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव केला जाणार आहे.नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्था'' ही विविध सामाजिक कार्यात अग्रेसर असणारी संस्था असून. सामाजिक कार्यात या संस्थाचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे. २५ जून

( पान – २ वर)

## धावत्या कॅबमध्ये महिला पायलटचा विनयभंग

मुंबई : मुंबईत महिला पायलटचा धावत्या कॅबमध्ये विनयभंग झाल्यामुळे सर्वत्र खळबळ माजली आहे. गुरुवारी रात्री अशी धक्कादायक घटना घडली आहे.

यामुळे मुंबई खरंच महिलांसाठी सुरक्षित आहे का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी एक २८ वर्षीय महिला पायलट सीएसएमटी स्थानकावरून स्वत:च्या घरी निघाली होती. पतीला भेटल्यानंतर त्याने महिला पायलटसाठी कॅब बूक केली. थोड्या अंतरावर गेल्यानंतर कॅब ड्रायव्हरने अचानक रस्ता बदलला. पुढे गेल्यानंतर त्याने कार थांबवली आणि दोन अन्य पुरुषांना कॅबमध्ये बसवले. एक पुरुष पुढे ड्रायव्हरच्या बाजूला बसला.

तर दुसरा पुरुष मागे महिला पायलटच्या बाजूला बसला. दोन अनोळखी पुरुष कॅबमध्ये बसल्यामुळे महिला पायलट घाबरली आणि तिने आरडाओरड करण्यास सुरू केली.



अशात एका पुरुषाने ओरडू नकोस म्हणून धमकी दिली. तर अन्य एका पुरुषाने महिला पायलटला वाईट स्पर्श केला.याप्रकरणी महिलेने पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी ड्रायव्हरला ताब्यात घेतले असून दोन आरोपींचा शोध अद्याप सुरू आहे.

## जीन्स आणि टॉपमध्ये दिसू लागल्या हायफाय भिकारी

■ लोकांकीत न्युज नेटवर्क

रायबरेली : उत्तर प्रदेशच्या रायबरेलीमध्ये सध्या खळबळ उडाली आहे. जीन्स आणि टॉप, पायात शूज अशा हायफाय पेहरावात अनेक महिला भीक मागताना दिसत आहेत. कोणाला विश्वासच बसत नव्हता, परंतु त्यांचे रडगाणे ऐकून लोक त्यांना चक्क १००-२०० रुपये भीक म्हणून देत होते.



एवढ्या चांगल्या घरच्या दिसणा-या महिला भीक मागताना पाहून काहींना संशय आला म्हणून त्यांनी थेट पोलिसांनाच सांगत काही महिलांना ताब्यात घेण्यास लावले आहे. जास्त भीक मिळण्यासाठी हा नवा फंडा सुरु झाला आहे. काही तरुणींना पोलिसांनी अटक केली आहे. रस्त्यारस्त्यांवर या महिला कारचालक असेल किंवा दुचाकीचालक त्यांना आपले रडगाणे सांगून भीक मागत होत्या. आपण खूप त्रस्त आहोत, घरची हालत खराब आहे थोडी आर्थिक मदत हवी आहे असे सांगत त्या वाहनचालकांकडून पैसे उकळत होत्या.

रायबरेलीच्या आंवला-बदायू रोडवरील मेडिकल कॉलेजजवळ त्यांनी हे कृत्य करण्यास सुरुवात केली होती. सुरुवातीला लोकांना त्यांच्या पेहरावाकडे पाहून विश्वास बसू लागला होता. अनेकांनी त्यांच्या भुलथापांना बळी पडून १००-२०० रुपये दिले होते. रस्त्यावरचा भिकारी असेल तर त्याला सहसा दोन-पाच, दहा रुपये दिले जातात. परंतु, या महिला चांगल्या पोशाखात असल्याने त्या चांगल्या घरच्या वाटत होत्या.

त्यांना खरोखरच गरज असेल म्हणून विचार करून लोक पैसे देत होते. हेच हेरून या महिला अहमदाबादहून रायबरेलीमध्ये भीक मागण्यासाठी आल्या होत्या.


धक्कादायक बाब म्हणजे या महिलांकडे पोलिसांनी चौकशी केली असता त्यांनी गुजरातच्या अहमदाबादच्या असल्याचे सांगितले परंतू त्या बरेलीला कशा पोहोचल्या याचे उत्तर मात्र देऊ शकल्या नाहीत. पोलिसांनी या महिलांविरोधात शांततेत बाधा आणल्याचा गुन्हा दाखल करून कोर्टात हजर केले. त्यांना प्रत्येकी २ लाख रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर सोडण्यात आले आहे.

## आता पॅनकार्डसाठी आधारकार्ड अनिवार्य १ जुलैपासून नवा नियम, करप्रणाली मजबूत करण्याच्या दृष्टीने उचलले पाऊल

■ लोकांकीत न्युज नेटवर्क

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

करदात्यांशी संबंधित नियमावलीत बदल करण्यात येत असून, आता १ जुलैपासून नवीन नियम लागू होणार आहे. आता पॅन कार्डसाठी अर्ज करण्यासाठी आधार कार्ड अनिवार्य असेल. कर प्रणाली अधिक मजबूत करण्यासाठी आणि फसवणूक रोखण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले असून या नवीन नियमानुसार तुमच्याकडे आधार कार्ड नसेल तर तुम्ही पॅन कार्डसाठी अर्ज करू शकणार नाही. त्यामुळे ज्यांच्याकडे आधारकार्ड नाही, त्यांना तातडीने आधारकार्ड काढावे लागणार आहे.




करदात्याच्या दृष्टीने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून, यामुळे करचोरी रोखली जाईल आणि करदात्यांची ओळख अधिक अचूक होईल, असे सरकारचे म्हणणे आहे. म्हणून जर तुम्ही पॅन कार्डसाठी अर्ज करण्याचा विचार करत असाल तर आधी तुमचे आधार कार्ड बनवून घ्या, असे सांगण्यात आले. १ जुलैपासून हा नियम लागू होणार असल्याने आता ज्यांच्याकडे आधारकार्ड नाही, त्यांना आता आधारकार्ड काढून घ्यावे लागणार आहे.

सध्याच्या नियमानुसार, पॅन क्रमांकासाठी अर्ज करताना अर्जदाराला त्याचे नाव आणि जन्म दिनांकाचा पुरावा जोडून किंवा पर्यायी ओळख कागदपत्रे जोडून अर्ज करता येत होता. मात्र, एक जुलैपासून तसे करता येणार नाही. डिजिटलायझेशनची प्रक्रिया सध्या सुरू असल्यामुळे पॅनसाठी आधारवर आधारित पडताळणी प्रणाली राबवण्यात येत असल्याचे संबंधित अधिका-याने सांगितले.

एकाच व्यक्तीकडे अनेक पॅनकार्ड असण्याची प्रकरणे उघडकीस आल्यानंतर पॅन आणि आधार एकमेकांशी संलग्न करणे अनिवार्य झाले. त्याचप्रमाणे जीएसटी नोंदणी करताना अनेक पॅन क्रमांकांच्या मदतीने नोंदणी करून जीएसटी चुकवण्याच्या घटनाही उघडकीस आल्या आहेत. मार्च २०२४ पर्यंत देशातील पॅनकार्डधारकांची संख्या ७४ कोटी नोंदली गेलेली आहे. यापैकी ६०.५० कोटी नागरिकांनी पॅन-आधार जोडणी पूर्ण केली आहे.पॅनकार्डचे डिजिटायझेशन होणार

प्राप्तिकर विभाग पॅन २.० ही मोहीम राबवण्यासाठी सज्ज झाला आहे. मोहिमेअंतर्गत पॅनकार्डधारकांना पॅनकार्डे डिजिटल स्वरूपात दिली जाणार आहेत. पॅनकार्डांचेही डिजिटायझेशन होणार आहे. यामुळे करदात्यांना चांगली सेवा दिली जाईल, असा प्राप्तिकर विभागाचा दावा आहे. सध्या ज्यांच्याकडे पॅनकार्ड आहेत, ते तीच कार्ड वापरू शकतील. नवी मोहीम राबवली जाणार असली तरी जुनी कार्ड वैध राहणार आहेत.

संपादकीय

## समानतेची पताका उंचावणारी आषाढी वारी

यंदा आषाढी एकादशी दिनांक ६ जुलै २०२५ ला आहे. नामदेव, तुकाराम, विसोबा खेचर, सावता माळी, सेना, बंका, दामाजी पंत, जनाई, बहिणाबाई, सोयराबाई, निर्मळा, चोखोबा, कान्होपात्रा हे विविध जातींचे संत होते. त्यांनी कर्मठ समाजाचा उपहास, निंदा सहन केली. पण विठ्ठल भक्ती हा समान धागा त्यांना आत्मिक भावाने समतेचा संदेश देत राहिला. केवळ हिंदूच नाही तर अन्य धर्मीय देखील विठ्ठलास मानतात. परदेशांतून देखील अनेक पर्यटक यासाठी येतात. भागवत धर्माचे वारकरी पताका, दिंडी, पालख्या घेऊन लाखोंच्या संख्येने विठ्ठल नामाचा गजर करीत पंढरपूर येथे येऊन श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतात. ८०० वर्षांहूनही अधिक याचा इतिहास आहे. वैष्णवांसाठी हा एक भक्तिसोहळा असतो. भक्त पुंडलिक यांना वारकरी संप्रदायाचे आद्य प्रवर्तक मानले जाते. हैबतबाबा हे सातारा जिल्ह्यातील आरफळ गावचे देशमुख होते. हैबतबाबांनी ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका पालखीत घालून दिंडी-समारंभासह, थाटाने ऐश्वर्याने व सोहळ्याने पंढरपूरला नेण्याची प्रथा चालू केली.

१२९१ मध्ये ज्ञानेश्वर आळंदी येथून पंढरपूरपर्यंत पायी चालत गेले. तुकाराम महाराजांचे पूर्वज विश्वंभर बाबा हे ज्ञानदेव-नामदेवांच्या समकालीन होते. त्यांच्या घराण्यात पंढरीची वारी होती. स्वत: तुकोबा चौदाशे टाळकरी घेऊन प्रत्येक शुद्ध एकादशीस पंढरपूरला जात असत. तुकोबांच्या निधनानंतर त्यांचे कनिष्ठ पुत्र नारायण महाराज यांनी वारीचे रूपांतर पालखी सोहळ्यात केले. अनेक संतांच्या पालख्या पंढरपूरला येतात.शेगाव येथून श्री संत गजानन महाराजांची, आळंदीहून ज्ञानेश्वरांची, देहूहून तुकारामांची, त्र्यंबकेश्वरहून निवृत्तीनाथांची, पैठणहून एकनाथांची, उत्तर भारतातून कबिरांची पालखी येते. तसेच, सोपानदेव, मुक्ताबाई, जनार्दन स्वामी, सावता माळी, रामदास स्वामी यांच्या पालख्याही दर्शनासाठी पंढरीस येतात

हौसे, नवसे, गवसे या वारीत सामील होतात. त्यामुळे पोलिस देखील वारकरी वेशात वावरतात. चोर, पाकीटमार यांच्यावर नजर ठेवतात. अनेक साहित्य संस्था वारीमध्ये सहभागी होतात आणि प्रबोधन करणे, मनोरंजन करणे अशी कामे करतात. चार पावले वारीत चालावीत असे म्हणतात. पण, काहींनी वारीला इव्हेंट केले आहे.

वारीमध्ये वारकरी फुगड्या खेळतात, नाचतात. वाटेत, प्रवासात मुक्कामी दिंडी थांबली की प्रवचन, कीर्तन केले जाते. लोक वारक-यांसाठी महाभोजन ठेवतात. वाटेत अनेक समाजकार्य करणा-या संस्था औषधोपचार, पाणी वगैरेंची व्यवस्था करतात. आषाढी वारीचे वैशिष्ट्य म्हणजे रिंगण आणि धावे होय. कडूस फाटा, वेळापूर आणि वाखरी येथे रिंगण होते. वारकरी रिंगण धरून हरिनामाचा गजर करतात. ज्ञानेश्वर माऊली यांचा अश्व या रिंगणात धावतो. पंढरपूरला पायी जात असताना संत तुकाराम महाराज यांना वेळापूर येथील छोट्याशा टेकडीवरून विठ्ठलाच्या देवळाच्या कळसाचे दर्शन झाले आणि विठ्ठलाच्या दर्शन ओढीने ते तिथून पंढरपूरपर्यंत धावत गेले. म्हणून वेळापूरपासून वारकरी पंढरपूरपर्यंत धावत जातात. याला धावे म्हणतात. आषाढी एकादशीला वारकरी संप्रदायात उपवास करण्याचे विशेष महत्त्व आहे. दुपारी, रात्री भोजनात उपवासाचे राजगिरा, साबुदाणा, बटाटा, रताळे, वरई, शेंगदाणे यापासून तयार केलेले विविध पदार्थ सेवन केले जातात. केळी आदी फळांचा देखील समावेश असतो.

जे पंढरपूर येथे जाऊ शकत नाहीत ते स्थानिक विठ्ठल मंदिरांत देवदर्शन करतात. आषाढ महिन्यात शुक्ल पक्षात येणा-या देवशयनी एकादशीला हरिशयनी असेही म्हटले जाते. देवशयनी एकादशीबद्दल असे मानले जाते की या दिवशी भगवान विष्णू क्षीरसागरात शेषनागावर झोपी जातात. धार्मिक मान्यतेनुसार मनुष्याचं एक वर्ष हे देवांची एक अहोरात्र असते. दक्षिणायन ही देवांची रात्र असते आणि उत्तरायण हा दिवस असतो. आषाढ महिन्यातील कर्क संक्रांतीला उत्तरायण पूर्ण होते आणि दक्षिणायनाला सुरुवात होते. म्हणून आषाढ महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशीला देवशयनी एकादशी किंवा हरिशयनी एकादशी असे म्हटले जाते. यानंतर भगवान विष्णू कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशीला म्हणजेच प्रबोधिनी एकादशीला जागे होतात. हा काळ चातुर्मास म्हणून ओळखला जातो आणि हा पावसाळ्यासोबतच असतो.

कार्तिकी एकादशीला पालख्यांची परत वारी होते. शयनी एकादशी म्हणजे चातुर्मासाची सुरुवात. या दिवशी विष्णूला प्रसन्न करण्यासाठी उपासना आणि उपवास केले जातात.

# डिजिटल पेमेंटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाकडून इंडसइंड बँकेचा सन्मान

**लोकांकीत न्युज नेटवर्क**

पनवेल (प्रतिनिधी) भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाकडून २०२३-२४चा डिजिटल पेमेंट्स पुरस्कार मिळाल्याची घोषणा इंडसइंड बँकेने केली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात डिजिटल पेमेंटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल खासगी क्षेत्रातील बँकांमध्ये या बँकेने तिसरा क्रमांक पटकावला. नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे झालेल्या या पुरस्कार सोहळ्याला केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण प्रमुख पाहुण्या म्हणून आणि अर्थ राज्यमंत्री श्री. पंकज चौधरी सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते.

डिजिटल क्षमता वाढवण्याच्या आणि देशभरातील लाखो लोकांना सक्षम बनवणाऱ्या सुरक्षित, स्केलेबल तसेच नावीन्यपूर्ण डिजिटल पेमेंट सोल्यूशन्स प्रदान करण्याच्या इंडसइंड बँकेच्या अढळ वचनबद्धतेचा हा पुरस्कार म्हणजे एक पुरावा आहे. वित्तीय सेवा विभागाने जारी केलेल्या अधिकृत स्कोअरकार्डनुसार, बँकेने आर्थिक वर्ष २३-२४ मध्ये डिजिटल व्यवहाराचे १२० टक्के लक्ष्य साध्य केले - जे भारतातील सर्व खासगी क्षेत्रातील बँकांमध्ये सर्वाधिक आहे. डिजिटल पेमेंट्स पुरस्कार समारंभात इंडसइंड बँकेच्या श्री. रितेश राज सक्सेना, डायरेक्ट बँकिंग प्रमुख आणि श्री. देव रतन सुरी, प्रमुख - एसडीजी (पेमेंट्स, कार्ड्स आणि सरकारी व्यवसाय) यांना श्री. एम. नागराजू, सचिव, वित्तीय सेवा

IndusInd Bank

विभाग आणि डॉ. अभिजित फुकोन, आर्थिक सल्लागार, डीएफएस यांनी हा पुरस्कार प्रदान केला.

या कामगिरीबद्दल इंडसइंड बँकेचे ग्राहक बँकिंग आणि विपणन प्रमुख सौमित्र सेन म्हणाले, ''हा पुरस्कार आम्हाला दिल्याबद्दल आणि देशभरात डिजिटल स्वीकार वाढवण्यासाठी इंडसइंड बँकेच्या प्रयत्नांना मान्यता दिल्याबद्दल आम्ही अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाचे आभारी आहोत. आयएनडीआयइ सारख्या आमच्या वेगळ्या प्लॅटफॉर्मद्वारे सतत नावीन्यपूर्ण आणि आमच्या ग्राहकांना अंतर्ज्ञानी, सुरक्षित आणि वैयक्तिकृत बँकिंग अनुभव देण्याच्या आमच्या संकल्पाला ही मान्यता बळकटी देते. भारताच्या डिजिटल प्रवासाला पाठिंबा देण्यासाठी आणि समाजातील प्रत्येक घटकासाठी बँकिंग सुलभ आणि सहज बनवण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.'' डिजिटल २.० धोरणाअंतर्गत, इंडसइंड बँकेने अखंड, सर्वसमावेशक आणि नावीन्यपूर्ण आर्थिक अनुभव देत आहे. आमचे प्रमुख ॲप, आयएनडीआयइ हे ॲप स्टोअरवरील सर्वाधिक रेटेड ॲप आहे. १. ६ दशलक्ष सक्रिय वापरकर्त्यांसह रिटेल बँकिंगची पुनर्परिभाषा करत आहे. पूर्णपणे डिजिटल होण्याच्या प्रवासांतर्गत बँकेच्या डिजिटल क्रेडिट प्लॅटफॉर्मने दरमहा १. २ दशलक्ष अर्जांवर प्रक्रिया केली. ९३ टक्के (३१ मार्च २०२५ पर्यंत) एकूण डिजिटल व्यवहारांसह, इंडसइंड बँक भारतातील डिजिटल पेमेंट क्षेत्रात आघाडीवर आहे.

( पान - १ वरून )

# लोकनेते दी. बा. पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त साजरा होणार समाजासाठी एक पाऊल पुढे कार्यक्रम

रोजी पार पडणाऱ्या ''चला समाजासाठी एक पाऊल पुढे टाकूया या विशेष कार्यक्रमा अंतर्गत फक्त जेष्ठ नागरिकांना छत्र्या भेट देणे अथवा नवी मुंबई विभागातील १० वी १२ वी च्या विद्यार्थ्यांचा गुण गौरव करणे इतकाच या संस्थेचा मानस नसून आपल्या विभागातील ज्येष्ठांचा सन्मान व विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन हेच आमचे ध्येय!आहे अशी माहिती''नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्था''च्या सर्व पदाधिकाऱ्यांनी दिली असून,या महान कार्यात आपण सर्वांनी सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे अशी नम्र विनंती देखील संस्थे कडून करण्यात आली आहे.दिनांक २५ जून २०२५ रोजी सायं ४ वाजल्यापासून हा कार्यक्रम सिडको एक्सझीबिशन सेंटर ऑडिटोरियम, जोयालूक्कास ज्वेलर्स समोर, सेक्टर-३०, वाशी, नवी मुंबई या ठिकाणी पार पडणार आहे. आणी या कार्यक्रमास नवी मुंबई महानगर पालिकेचे विरोधी पक्ष नेते श्री.दशरथ भगत ( नाना ),युवा नेते श्री. निशांत भगत( भाऊ),ज्ञसमाज सेवक श्री.संदीप भगत,माजी नगरसेविका श्रीमती फशीबाई करसन भगत,माजी नगरसेविका सौं.वैजयंती दशरथ भगत,माजी नगरसेविका सौं.रुपाली निशांत भगत या सर्वांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. लोकनेते स्व. दी. बा पाटील साहेबांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित '' चला समाजा साठी एक पाऊल पुढे टाकूया '' या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते, लोकसेवक, पत्रकार, विविध क्षेत्रातील मान्यवर आणी नवी मुंबई विभागातील नागरिकांनी आपली उपस्थिती दर्शवावी अशी विनंती तथा आवाहन ''नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्था'' यांचेकडून करण्यात आले आहे.

# चिंचपोकळी येथील कॉम्रेड गुलाबराव गणाचार्य चौकामधील स्मृतीस्थळ व वाहतूक बेटाची पूर्नबांधणी करण्याची मागणी

**लोकांकीत न्युज नेटवर्क**

मुंबई : चिंचपोकळी येथील कॉम्रेड गुलाबराव गणाचार्य चौकामध्ये अनेक अपघात होत असल्याकारणाने तेथे कॉम्रेड गुलाबराव गणाचार्य स्मृतिस्थळ व वाहतूक भेट यांची पुनर्बांधनी ताबडतोब करावी असे चौकातील सर्व नागरिकांची मागणी असल्याकारणाने बुधवार दिनांक १८ जून २०२५ रोजी प्रशांत परदेशी ,

पोलीस उपायुक्त वाहतूक विभाग १, भायखळा पोलीस स्टेशनच्या शेजारी, भायखळा येथे अनिल गणाचार्य यांनी कॉम्रेड गुलाबराव गणाचार्य स्मारक यांचे नाक्यावरती स्मृती स्थळ व वाहतूक भेट पुनर बांधणी करण्याबाबतचे निवेदन दिले .प्रशांत परदेशी यांनी तात्काळ पुढच्या आठवड्यामध्ये मी नाक्यावरती भेट देतो व पुढच्या कारवाईला आपण प्रारंभ करू असे आश्वासन दिले.



# अभियंता तरूणीचा एका भरधाव डंपरने बळी घेतला

**लोकांकीत न्युज नेटवर्क**

रमेश जयस्वाल
जिल्हा प्रतिनिधी पुणे

बाणेर पोलीस ठाण्या अंतर्गत येणा-या गणेश दत्त मंदिर चौकातून ज्युपिटर हॉस्पिटलकडे जाणा-या रस्त्यावर अभियंता तरुणी तेजल प्रकाश तायडे ( वय २७ रा ठाणे) या तरुणीचा बळी घेतला तसेच मागे बसलेली प्राची जग्गनाथ पाचंगे ( वय २८ रा डांगे चौक ) ही तरुणी जखमी झालेली आहे या विभागात




भरधाव वाहने चालवण्यावर कोणाचेही निर्बंध नाही डंपर , टॅंकर, सिमेंट मिक्सर, पाणी टॅंकर हे भरधाव भर वस्तीवरून रोडवर वाहने हाकत असतात नियमानुसार या जड वाहनांना शहरात दिवसा बंदी असतांनाही लमान बोळातून ईतर ठिकाणी हे जड वाहने रोडवर भरधाव धावत आहे कोणत्याही चौकात कोणताही वाहतूक पोलीस हजर राहत नाही यामूळे या वाहन चालकावर कोणतेही बंधन दिसत नाही जड वाहनास भर रस्त्यांवर दिवसा बंदी असतां से भरधाव धावत आहे यात बळी जात आहे सर्व सामान्य जनता , या प्रकरणात कोण दोषी आहे हा प्रश्न नंतरचा परंतू या जड वाहनास शहरात दिवसा बंदी असतांनाही वाहतूक पोलीस काय करतात शेवटी ही तरूणी तरूण वयात बळी गेली यावर राजकिय पूढा-यांची मठ्ठपणाची भूमीका दिसत आहे यावर कोणत्याही पूढा-यांनी आवाज उठविला नाही मग आपले राजकिय स्वार्थ पूढे दिसत आहे मृत्यूमूखी पडलेली आणि जखमी झालेली तरुणी ही बाहेरच्या जिल्ह्याची असल्या कारणाने कोणीही आवाज ऊठवला नाही हिच तरूणी एखाद्या राजकिय घराण्याची किंवा राजकिय साथीदाराची तसेच पुण्यातिल असती तर आज हे मगरमठ्ठ असलेले राजकिय पूढारी या करिता रस्त्यावर उतरले असते ही काय राजकिय नितीमत्ता ? याप्रकरणी डंपर चालक राहूल भीमराव राठोड ( वय २४ रा भोंडवेवस्ती रावेत ) याच्यावर गून्हा दाखल करण्यात आला आहे प्रत्यक्षात तेजस ही आयटी अभियंता म्हणून ठाण्यातील एका कंपनीत काम करते काही कामा निमित्त ही पुण्यात आली यात तिचा वाढदिवस यानिमित्त प्राची पाचंगे सोबत हाय स्ट्रीट बालेवीडी परिसरात आली जेवढ घेतल्या नंतर केक घेऊन दोघी घराकडे निघाली तेजस दूचाकी चालवत होती तर प्राची मागे बसली होती गणेश दत्त मंदीर चौक ज्युपिटर हॉस्पिटल रस्त्याने जात असताना भरधाव येत असलेल्या डंपरने दुचाकीला धडक दिली या दोघींना तातडीने रूग्णालयत भरति करण्यात आले यात उपचारादरम्यान तेजसचा मृत्यू झाला यात या दोगींचा काय दोष होता विनाकारण यात तेजसचा बळी गेला शहर परिसरातील प्रमुख रस्त्यांवर डंपर, सिमेंट मिक्सर , ट्रक आणि अवजड वाहनांना बंदी असतांनाही आदेश धूडकाऊन हे वाहने राजेरोस पणे सूरू आहे यात नियमाची पायामल्ली पोलीस विभागा कडून होतांना दिसत आहे अवजड वाहनांना बंदी असतांनाही ही वाहने कोणाच्या आदेशाने आणि कोणाच्या भरवश्यावर सूरू आहे रोज दोन शे तिनशे अवजड वाहने बाणेर बालेवाडी परिसरात आर्थीक घेवाण देवाण करून धावत आहे याची आकडेवाडी वाढ होऊ शकते या विभागात अनेक बिल्डींगचे कामे सूरू आहे यात सिमेंट मिक्सर , माती- दगड- मूरूम असे वाहन नेणारे जड वाहने, पाण्याचे टॅंकर रोज बिनबोभाट धावत आहे ही वाहने भरधाव वेगाने धावतात अपघात घडल्यास काही दिवसा करिता या वाहनावर कारवाई स्थानिक पोलीस ठाणे आणि वाहतूक पोलीस करतात आणि या नंतर येरे माझ्या मागल्या सारखी स्थिती या विभागाची आहे बळी गेलेली तरूणी आयटी कंपनीत कामाला होती हिचा काय दोष ? या अपघाताला सर्व कारणी दोषी असाल तर ते स्थानिक पोलीस स्टेशन आणि वाहतूक विभाग या अपघाता प्रकरणी यांच्यावरही गून्हा दाखल करण्याची मागणी जनते कडून होत आहे नाही तर असेच बळी जात राहनार ?

# आंतरराष्ट्रीय योग दिन वाशीमध्ये उत्साहात साजरा वनमंत्री आणि प्रशासक यांचा संयुक्त योगा.कार्यक्रमाचे विशेष आकर्षण

**लोकांकीत न्युज नेटवर्क**

वाशी नवी मुंबई । २१ जून २०२५ (प्रतिक यादव)

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिन सिडको एक्झिबिशन सेंटर येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या विशेष दिवशी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे आणि महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री मा. गणेश नाईक यांनी एकत्र येत नागरिकांसमवेत योग साधना केली आणि उत्तम आरोग्यासाठी मिळून योगा करून योग जनजागृती संदेश दिला. या कार्यक्रमाचे आयोजन नवी मुंबई महापालिका उपायुक्त डॉ. अजय गडदे , अभिलाषा म्हात्रे आणि स्मिता काळे यांनी केले होते.

वनमंत्री गणेश नाईक आणि डॉ कैलास शिंदे प्रशासक यांचा संयुक्त योगा

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण



महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक आणि नवी मुंबई महानगरपालिका प्रशासक डॉ कैलास शिंदे यांनी दोन योग साधक यांनी मिळून करण्यात येणाऱ्या योगा प्रकारात मिळून विविध योग आसने केल्याने कार्यक्रमाची उंची वाढली आणि नवी मुंबईतील नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरला.

आमदार मंदा म्हात्रे यांची उपस्थिती

कार्यक्रमाचे आयोजन नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून करण्यात आले होते, जिथे स्थानिक आमदार मा. मंदाताई म्हात्रे यांचीही उपस्थिती लाभली. त्यांनी साडी परिधान करून या कार्यक्रमास उपस्थिती लावून योगा केला त्यामुळे योगा करण्यासाठी इच्छा आणि महत्त्वाकांक्षा गरजेची असते हा संदेश जनमानसात पसरला.

हजारो नवी मुंबईकरांची हजेरी

सकाळच्या सत्रात आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात शेकडो महापालिका अधिकारी, कर्मचारी तसेच हजारो नागरिक सहभागी झाले होते. सकाळच्या प्रसन्न वातावरणात, सर्वांनी एकत्र येत योग साधना करून आरोग्य आणि मानसिक स्वास्थ्याचे महत्त्व अधोरेखित केले.नवी मुंबई महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे नवी मुंबईतील नागरिकांमध्ये योगाविषयी जागरूकता वाढली असून, आरोग्यदायी जीवनशैलीकडे वळण्याचा संदेशही दिला गेला. कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी महापालिकेच्या आरोग्य विभागाने यशस्वीरित्या पार पाडली.

या योग सत्राद्वारे “ ..” या संकल्पनेला अनुसरून, शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी योगाचा प्रभावी मार्ग म्हणून प्रचार करण्यात आला.

# माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सणसवाडी येथे योग दिन उत्साहामध्ये साजरा

**लोकांकीत न्युज नेटवर्क**

सणसवाडी (ता. शिरूर) येथील श्री नरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे माध्यमिक



व उच्च माध्यमिक विद्यालय सणसवाडी तालुका शिरूर,जिल्हा पुणे येथे जागतिक योग दिनाच्या निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करत योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रशालेच्या प्रांगणात शिक्षक व विद्यार्थ्यांनी सामूहिकरित्या योगासने व प्राणायाम सत्रात सहभाग घेतला.

यावेळी श्री नरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सणसवाडी, तालुका शिरूर ,जिल्हा पुणे. संस्थेचे अध्यक्ष श्री आनंदराव हरगुडे साहेब, सचिव श्री साठे बाबासाहेब ग्रामपंचायत सरपंच सौ रूपाली ताई दगडूनाना दरेकर ,उपसरपंच श्री राजूअण्णा दरेकर,प्राचार्य सौ मेंगवडे मॅडम,पर्यवेक्षक श्री दरेकर सर ,क्रीडा शिक्षक श्री वडघुले सर, ब्रह्मकुमारी ईश्वरी विद्यालय श्रीम अर्चना मॅडम यांच्यासह ९७८ विद्यार्थी सहभागी झाले.यावेळी ब्रह्मकुमारी ईश्वरी विद्यालयाच्या श्रीमती अर्चना मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले की,आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमध्ये योग साधना ही शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.शारीरिक दृष्ट्या सदृढ राहायचे असेल तर योगाशिवाय पर्याय नाही असे त्या म्हणाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ कर्डिले मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री वडघुले सर यांनी केले.

# स्मरणशक्ती,एकाग्रता वाढीसाठी विद्यार्थ्यांनी नियमित योग करावा – जाधव

**लोकांकीत न्युज नेटवर्क**

धाराशिव (प्रतिनिधी) शालेय विद्यार्थ्यांनी स्मरणशक्ती,एकाग्रता वाढीसाठी नियमित योग करावा. त्यामुळे गुणवत्ता वाढीला मदत होते. असे मत योगशिक्षक चंद्रकांत जाधव यांनी व्यक्त केले.ङ्ग शिंगोली (ता.जि.धाराशिव) येथील आश्रम शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी चंद्रकांत जाधव मार्गदर्शन करताना बोलत होते.ङ्ग मुख्याध्यापक अण्णासाहेब चव्हाण,क्रिडा शिक्षक सुधीर कांबळे,पर्यवेक्षक रत्नाकर पाटील,प्रशांत राठोड,आदर्श विमुक्त जाती प्राथमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक सतीश



कुंभार यांनी योगगुरू चंद्रकांत जाधव यांचा श्रीफळ,शाल, पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान केला. ङ्ग चंद्रकांत जाधव यांनी विद्यार्थांना योगा बद्दल माहिती दिली.भारतीयांची जगासाठी अनमोल भेट म्हणजे योग, निरोगी शरीरात निकोप मन वास करत असते.शरीर हीच आरोग्य संपदा आहे.विदयार्थ्यांनी रोज सकाळी पहाटे पाच वाजता उठून योग करावा,त्यामुळे आपले मन ऐकाग्र होते,शालेय विद्यार्थ्यांनी स्मरणशक्ती,एकाग्रता वाढीसाठी नियमित योग करावा. त्यामुळे गुणवत्ता वाढीला मदत होते. असे मत व्यक्त केले.ङ्ग हे जग गुणवत्तेचे असून स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी योग करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना शवासन, ताडासन,पद्मासन, हलासन,शिर्षासन,वज्रासन, धनुआसन, प्राणायाम, सुर्यनमस्कार यांची प्रात्यक्षीक चंद्रकांत जाधव व सुधीर कांबळे यांनी दाखवून सर्वाकडून करून घेतली.ङ्ग यावेळी खंडू पडवळ,दिपक,खबोले, शानिमे कैलास,मल्लिनाथ कोणदे,विशाल राठोड,सचीन राठोड,वरिष्ठ लिपीक संजीवकुमार मस्के,सुरेखा कांबळे, श्रद्धा सुर्यवंशी,ज्योती राठोड,ज्योती साने,बालिका बोयणे, वैशाली शितोळे इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सागर सुर्यवंशी, अविनाश घोडके, सचीन अनंतकळवास,रेवा चव्हाण व विद्यार्थी कार्यक्रमासाठी मोठया संख्येने उपस्थित होते.

# विश्वनिकेतन अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठाच्या परीक्षेमध्ये भरघोस यश

**लोकांकीत न्युज नेटवर्क**

मे २०२५ मध्ये मुंबई विद्यापीठाकडून इंजिनिअरिंग विभागाच्या ८ सत्राच्या परीक्षा घेण्यात आल्या होत्या त्यातील कम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग (एआय एम एल) या विभागाचा निकाल लागला असून त्यात खालापूर कुंभवली येथील विश्वनिकेतन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट एंटरप्रेनरशिप अँड इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजी या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भरघोस यश प्राप्त केले आहे. या महाविद्यालयातील कम्प्युटर




सायन्स अँड इंजीनियरिंग ( एआय एम एल) या विभागाचा निकाल ९५.५२% इतका लागला. ङ्गकुमारी अपूर्वा इंगळे आणि कुमारी कीर्ती हंबीर यांनी ९.७१ या एसजीपीआय सह महाविद्यालयात प्रथम तर विद्यापीठात चौथा येण्याचा मान मिळवला. ङ्गकुमार जयेश थत्ते आणि कुमारी सायली धुरी यांनी ९.५७ या एसजीपीआय सह महाविद्यालयात द्वितीय तर विद्यापीठात पाचवा येण्याचा मान मिळवला. ङ्गकुमार अनिकेत सूर्यवंशी, कुमार हर्षद म्हात्रे, कुमार आयुष विश्वकर्मा आणि कुमारी श्रेया मनकावळे यांनी ९.२९ या एसजीपीआय सह महाविद्यालयात तिसरा आणि विद्यापीठात नववा येण्याचा मान मिळवला. ङ्गसंस्थेचे उपाध्यक्ष डॉ. संदीप इनामदार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. आर. पाटील, उपप्राचार्य डॉ. शंकर कदम, प्रा. शिवानी अग्रवाल, विभाग प्रमुख डॉ. अंकुश पवार व इतर प्राध्यापक वर्गाणी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# मेरा युवा भारत वाशिमच्या वतीने ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात : “सामूहिक योगाला नागरिकांचा मोठा सहभाग

**लोकांकीत न्युज नेटवर्क**

वाशिम, दि. २१ जून योग ही भारताची प्राचीन आणि अमूल्य देणगी आहे. योग कर्मसु कौशलम्‌ या भगवद्गीतेतील शिकवणीनुसार योग ही केवळ व्यायामाची पद्धत नसून, ती आरोग्य, समतोल आणि मानसिक शांती प्राप्त करण्याची जीवनशैली आहे. एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग या २०२५ सालच्या संकल्पनेनुसार वाशिम



शहरातील वाटाणे लॉन येथे उत्साहात संपन्न झाला. आयुष मंत्रालय, भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार, युवा कार्यक्रम येऊन खेल मंत्रालय भारत सरकार सलग्नित मेरा युवा भारत केंद्र वाशिम व जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद तसेच विविध योग संस्थांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.ङ्गयावेळी ङ्गकार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत विधानपरिषद सदस्य आमदार किरणराव सरनाईक बोलत होते . याप्रसंगी जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस.परिविक्षाधीन जिल्हाधिकारी आकाश वर्मा, तहसीलदार निलेश पळसकर, शिक्षणाधिकारी आकाश आहाळे, मुख्याधिकारी निलेश गायकवाड, जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर भोंडे, क्रीडा अधिकारी मारोती सोनकांबळे, मेरा युवा भारत केंद्र स्वयंसेवक प्रदिप पट्टेबहादूर,दत्ता मोहळे आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे योगप्रशिक्षक डॉ. हरिष बाहेती, आयुष विभागाच्या योग थेरपीस्ट तेजस्विनी माणिकराव,पतंजली योगसमितीचे डॉ.भागवत वानखेडे, पतंजली महिला योग समितीच्या दिपा वानखेडे, राजा प्रसेनजीत संस्था स्वयंसेविका वैष्णवी पानझडे आदींचा समावेश होता.

यावेळी उपस्थितांना आमदार किरणराव सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली योग प्रतिज्ञा देण्यात आली. योग दिनाच्या कार्यक्रमात क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, क्रीडा पुरस्कारार्थी, जिल्हा युवा पुरस्कारावरती, खेळाडू मार्गदर्शक, युवा मंडळ,स्काउट्स गाइड, एन एस एस, एनसीपी, योगसाधक,नागरिक, महिला, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक, आरोग्य विभागाचे कर्मचारी, पोलीस कर्मचारी तसेच अनेक सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सदर कार्यक्रम हा मीरा युवा भारत केंद्र जिल्हा युवा अधिकारी सारंग मेश्राम व लेखा अधिकारी अनिल ढेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला असून यामध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ व राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था केकतउमरा यांचे विशेष सहकार्य लाभले.

# ज्ञानधन विद्यार्थी सु– संस्कार केंद्रात विद्यार्थ्यांनी घेतले योगासनाचे धडे

**लोकांकीत न्युज नेटवर्क**

बीड – अंकुश नगर भागातील ज्ञान धन विद्यार्थी सु–संस्कार केंद्रात आंतरराष्ट्रीय ११ वा योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमात पहिली ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.अध्यक्षस्थानी विनायक वझे तर प्रमुख पाहुणे म्हणून सचिन कोटूळे हे होते. पुढे केंद्रातील सर्व विद्यार्थ्यांना योगा या विषयावर विविध उदाहरणे देऊन योग आणि योगा येथील फरक सांगितला. तसेच अडीच हजार वर्षांपूर्वी योग चे गुरु पतंजली यांनी निरोगी जीवन जगण्यासाठी योग हा



एकमेव पर्याय असून त्याचा लाभ विद्यार्थ्यांनो घ्यावा असे असे संबोधित करण्यात आले.संचालक महादेव काळकुटे यांनी योगच्या माध्यमातून योगचे देशातच नाही तर देशाच्या बाहेर आपले नाव केले असे मार्गदर्शन केले.यावेळी डॉ. राधा तांबे यांनी विद्यार्थ्यांकडून काही योगासने करून घेतले. तसेच आलेल्या सर्व योगशिक्षकांचा योगचा प्रसार आणि प्रचार करणाऱ्यांचा व योग संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा संचालक माधव काळकुटे व विकास गवते योग कोच यांच्या संकल्पनेतून सत्काराचा आयोजन देखील करण्यात आले. यावेळी योग शिक्षक निलेश लंके, रविंद्र शिनगारे, रामचंद्र ठोसर, बाबासाहेब कूडके, उद्धव लाड, रामकृष्ण राऊत,भारत ठोंबरे, फहीम इनामदार, कमलाकर माने, राधिका वझे,पुष्करणी वझे इत्यादी योग शिक्षकानी उपस्थित विद्यार्थ्यांना योग विषयी माहिती दिली.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून २४ जूनला ऐरोली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकात प्रा.गोपाल गुरु यांचे विशेष व्याख्यान

■लोकांकीत न्युज नेटवर्क

नवी मुंबई महानगरपालिकेचे ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक तेथील अत्याधुनिक इ लायब्ररी सुविधेसह समृद्ध ग्रंथालय आणि तेथे नियमितपणे होणाऱ्या विचारवेध आणि जागर या व्याख्यानशृंखला यामुळे अल्पावधीतच ज्ञानस्मारक म्हणून देशभरात नावाजले जात आहे. अनेक नामांकित व्याख्यात्यांनी त्या ठिकाणी येऊन विविध विषयांवर आपली विचारधारा प्रकट केली आहे.

याच व्याख्यानांच्या मांदियाळीत २६ जून रोजीच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून मंगळवार, दि.२४ जून २०२५ रोजी, सायं. ६.३० वा. सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा.गोपाल गुरु यांचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षण विषयक आधुनिक दृष्टिकोन या विषयावरील व्याख्यान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथील सभागृह, ऐरोली मुलुंड खाडी पुलाजवळ, सेक्टर १५, ऐरोली येथे आयोजित करण्यात आले आहे.

इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल विकली या नियतकालिकाचे संपादक असलेले प्रा.गोपाल गुरु राज्यशास्त्राचे नामांकित अभ्यासक, प्राध्यापक आणि लेखक आहेत. सामाजिक न्याय आणि समता या विचारधारेवर सर्वस्पर्शी लेखन करणारे नामवंत व्याख्याते प्रा. गोपाल गुरु यांच्या व्याख्यानाप्रसंगी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात येत आहे.




# खारघर वाहतूक पोलिस शाखेचा अनोखा उपक्रम वाहन चालकांसाठी दंड तपासणी व भरण्याची सुविधा उपलब्ध

■लोकांकीत न्युज नेटवर्क

नवीन पनवेल : वाहन चालकाने नियमाचे उल्लंघन केल्यानंतर त्यांना ऑनलाईन दंड आकारला जातो. तो आकारलेला दंड भरायचा कुठे माहिती नसल्यामुळे वाहन चालक चालकांचा वेळ वाया जात होता ही बाब लक्षात घेऊन ङ्खारघर उड्डाणपुला खालील मंकी पॉईंट येथील वाहतूक चौकी येथे वाहनचालकांसाठी दंड तपासणी व भरण्याची सुविधा खारघर वाहतूक पोलीस शाखेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली आहे.




याठिकाणी वाहन चालक आपल्याविरोधातील प्रलंबित दंड तपासू शकतात तसेच तिथेच दंडाची रक्कम भरू शकतात.वाहतूक पोलिसांकडून वाहन चालकांना या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे वाहनचालकांना पोलीस ठाणे किंवा इतर कार्यालयात जावे न लागता थेट चौकीवरच आवश्यक ती कारवाई पूर्ण करता येणार आहे. यामुळे वेळेची बचत होणार असून वाहतूक व्यवस्थेत पारदर्शकता आणि शिस्त वाढण्यास मदत होईल या राबवत असलेल्या मोहिमेचे वाहन चालकांनी खारघर वाहतूक शाखेचे कौतुक केले आहे.

# बालग्राम अनाथाश्रमासाठी ग्रेसफुल हँड्स ट्रस्टने हृदयस्पर्शी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन केले

■लोकांकीत न्युज नेटवर्क

नवीन पनवेल : ग्रेसफुल हँड्स ट्रस्टने पनवेलच्या खांदा कॉलनीतील बालग्राम अनाथाश्रमात मुलांमध्ये सौहार्द वाढवणारा आनंदाचा कार्यक्रम आयोजित केला होता. बालग्राम ॲक्टिव्हिटी हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम, कु. पायल मधोक यांनी मार्गदर्शन केले आणि आदरणीय पाहुणे श्री अरविंद आणि डॉ. निलिमा मोरे आणि लता कुरियन, जीएचटीचे खजिनदार, स्वयंसेवक कृतिशी यादव, एन जैजराले, स्वयंसेवक कृतिशी यादव, एन. जैजराले यांनी मार्गदर्शन केले.

विजय खुटाळे, मिताली मंडल, उर्मिला जोशी, मनजीत कौर, नॅन्सी कुकरेजा, निशू सेठी आणि ग्रेसफुल टीमचे सदस्यच्या खजिनदार सुश्री लता कुरियन यांच्या स्वागतपर भाषणाने आणि सुश्री पायल मधोक यांच्या प्रेरक भाषणाने सुरुवात करून, दिवसाची सुरुवात उत्साहवर्धक सराव व्यायामाने झाली. एक हृदयस्पर्शी ठळक वैशिष्ट्य म्हणजे मुलांचा सहभाग, ज्यांनी योग सत्रात आनंदाने भाग घेतला. मुलांच्या आनंदासाठी त्यांच्या वचनबद्धतेचा पुरावा म्हणून, आणि चेअरपर्सन प्रा पायल मधोक यांनी आभार मानून उत्सवाचा समारोप झाला.



टीमने आयोजित केलेल्या आनंददायी डिनरमध्ये दिवसाची सांगता झाली, भविष्यात आणखी आकर्षक आणि रोमांचक क्रियाकलापांसाठी पुन्हा एकत्र येण्याच्या आश्वासनांसह.

# उमरखेड तहसील कार्यालयात ४ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना आर्थिक सहाय्य प्रदान

■लोकांकीत न्युज नेटवर्क

प्रतिनिधी उमरखेड

उमरखेड तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी एक लाख रूपयांची अशी एकूण चार कुटुंबांना ४ लाखाची मदत शासनाकडून आमदार किसनराव वानखेडे यांनी मंजुर करून घेतली होती

या चारही कुटुंबांना आज तहसील कार्यालय उमरखेड येथे प्रत्येकी एक - एक लाखाचे वाटप दिनांक २० जून रोजी आमदार किसनराव वानखेडे, जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, तहसीलदार राजेश सुरडकर यांच्या हस्ते करण्यात आले.



यामध्ये श्रीमती सुरेखा विजय चव्हाण ( रा.निंगणूर )श्रीमती सिंधुताई विलास राठोड ( रा.चुरमुरा )श्रीमती मीराबाई लक्ष्मण राठोड ( रा.बोथा वन )श्रीमती उषा उत्तम घुमणर ( रा.डोंगरगाव )या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांचा समावेश आहे .

यावेळी माजी आमदार विजयराव खडसे,माजी जि.प.अध्यक्ष रमेश चव्हाण,खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष सुदर्शन पाटील रावते,कृ.उ.बा.स.सभापती कृष्णा पाटील देवसरकर, विवेकानंद पाटील नलावडे, अंकुश वानखेडे, धनराज पाटील उपस्थित होते.

# हिंदी सक्ती नको पण दुर्लक्षित करुन चालणार नाही – शरद पवार

■लोकांकीत न्युज नेटवर्क

मुंबई / प्रतिनिधी – गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात हिंदी भाषा सक्तीचा मुद्दा चर्चेत आला आहे. त्यावरून राजकीय वर्तुळात प्रतिक्रिया उमटत असून सत्ताधारी व विरोधकांमध्ये चांगलेच जुंपल्याचं पाहायला मिळत असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी हिंदी भाषेची सक्ती करुन चालणार नाही पण ही बाब दुर्लक्ष करुन चालणार नाही अशी प्रतिक्रिया दिली आहे.शालेय शिक्षणात हिंदी भाषा विषय पहिलीपासूच शिकवण्यास विरोधी पक्षांनी तीव्र विरोध केला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी पत्रकार परिषद घेऊन हिंदी शिकवण्यास स्पष्ट विरोध दर्शवला असून उद्धव ठाकरे यांनीही शिवसेना मेळाव्यात यावर भूमिका



स्पष्ट केली या बाबत महाविकास आघाडीतील नेते शरद पवार यांनी त्यांची भूमिका मांडली आहे.ङ्गङ्ग पवार यांनी विविध विषयांवर भाष्य केलं सध्या चालू असलेल्या हिंदी भाषा वादाबाबत विचारणा केली तेव्हा शरद पवारांनी हिंदीची सक्ती असू नये, पण दुर्लक्ष करणं हितावह नाही, अशी भूमिका मांडली. देशातली ५५ ते ६० टक्के लोक हिंदी बोलतात असंही शरद पवार म्हणाले.

सक्ती नको पण हिंदी भाषेचा द्वेष करणे हे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हिताचं नाही. ज्याला जे हवंय, ते त्यानं करावं. विद्यार्थ्यांच्या पालकांनी त्यांच्या मार्गदर्शन नूसार विद्यार्थ्यांनी निर्णय घ्यावा. कुणी स्वत:हून शिकत असेल, तर नाही म्हणण्याचं कारण नाही. त्यामुळे सुसंवाद ठेवण्यासाठी या भाषेकडे दुर्लक्ष करणं योग्य नाही. पण सक्ती करू नये'', असं शरद पवार म्हणाले.ङ्गङ्ग गुरुवारीच्या शिवसेना मेळाव्यात उद्धव ठाकरेंनी आपल्या हिंदी भाषे संदर्भातील भूमिका स्पष्ट केली.महाराष्ट्रात हिंदी भाषेची सक्ती करण्याला आपला विरोधच आहे. देवेंद्र फडणवीस, तुम्ही इथे हिंदी सक्ती करूनच दाखवा'', असं उद्धव ठाकरेंनी यावेळी म्हटलं. ''भाजपा सरकार हिंदी आणि मराठीचा मुद्दा उकरून काढून हिंदूंमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहे. मूळ मुद्द्यां पासून भरकटवण्याचा प्रयत्न करत आहे'', अशा आशयाचं विधान उद्धव ठाकरेंनी यावेळी केलं.शिक्षण विभागाने मंगळवारी रात्री उशिरा प्रसिद्ध केलेल्या शुद्धिपत्रकात, राज्य मंडळाशी संलग्न मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांत पहिली ते पाचवीसाठी हिंदी ही सर्वसाधारण भाषा असल्याचे नमूद करून हिंदी ऐवजी अन्य भारतीय भाषा शिकण्यासाठी इयत्ता निहाय किमान २० विद्यार्थी असण्याची अट घालण्यात आली आहे. त्यामुळे अप्रत्यक्षरीत्या हिंदीची सक्तीच केली जाणार असल्याचे स्पष्ट होत असून, या निर्णयाच्या तत्काळ अंमलबजावणीचे निर्देश शिक्षण विभागाने दिले आहेत. आता यावरुन काय घडामोडी घडतात हे पहावं लागेल.

# नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास कटिबद्ध – माजी सभागृहनेते परेश ठाकूर

■लोकांकीत न्युज नेटवर्क

पनवेल (प्रतिनिधी) घोटगावाला स्मार्ट सिटी बनवण्यासाठी तसेच परीरातील नागरीकांचे जीवनमान उंचावण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी करत आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात नागरीकांचे सर्व प्रश्न मार्गी लावून त्यांना विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी भाजप काम करेल अशी ग्वाही पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी घोट येथे विविध विकास कामांच्या शुभारंभावेळी केले.



दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षनिमित्त विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्याअंतर्गत भाजपचे युवानेते नितेश पाटील यांच्यावतीने घोट गावातील नागरीकांना मोफत छत्री आणि परिसरातील सोसायट्यांना डस्टबिन वाटप कार्यक्रम आयोजित केला होता. तसेच यावेळी घोट गावाजवळ सुमारे १२ कोटी रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या पुलाचे उद्घाटन, १२ कोटी ६२ लाख रुपयांच्या निधीमधून साकारण्यात येणाऱ्या कोयनावेळे ते आरटीओ पर्यत्ताच्या रस्त्याच्या डांबीकरणाच्या कामाचे आणि सुमारे ९ कोटी ५ लाख रुपयांच्या निधीमधून बांधण्यात येणाऱ्या स्मशानभूमी भूमिपूजनाचा कार्यक्रम पार पडला. या कामांचे शुभारंभ भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठनेते अरुणशेठ भगत आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्याहस्ते झाले.

या वेळी माजी जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक हरेश केणी, संतोष भोईर, खारघर मंडल अध्यक्ष प्रविण पाटील, पनवेल उत्तर मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर, चिटणीस आशिष कडू, नवनाथ पाटील, माजी सरपंच संतोष पाटील, निर्दोष केणी, भाजपा नेते नितेश पाटील, हालोजी निघुकर, बाळकृष्ण पाटील, मोहन पाटील, शिवराम निघुकर, हरिभाऊ पाटील, एकनाथ पाटील, मोहन निघुकर, रमेश पाटील, दिनेश केणी, रविकांत म्हात्रे, नंदुकुमार म्हात्रे, सुरेश पोरजी, मंदार कदम, विनेश कदम, सुनील कदम, जयराम कदम, विजय कदम, गणेश निकोडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.



## !! विचारधन !!

आयुष्याचा शेवटचा मुक्काम कुणीही पाहिलेला नाही पण असं म्हणतात की,हा शेवटचा मुक्काम देवाच्या घरी असतो.

ज्याला आपण कधीही पाहिलेलं नाही पण त्याच्यावर श्रद्धा मात्र असतेच.पाहुणा म्हणून कुणाच्याही घरी जाताना आपण रिकाम्या हाताने जात नाही,मग ज्याची पूजा आयुष्यभर केली,ज्याच्यावर श्रद्धा ठेवली,त्या देवाच्या घरी जाताना तरी मोकळ्या हातांनी कसे जाणार.म्हणून जमेल तेव्हा चांगले काम केलं पाहिजे.म्हणजे देवाच्या घरी जाताना,त्याच सत्कर्माची शिदोरी घेऊन जाता येईल...

**श्री केशव चिलगर जय हो...**

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफीस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५ व्यवस्थापक अभय दत्ताराम वरणकर जाहिरात व्यवस्थापक संतोष सदाशिव कदम